# BDC LIBRARY
## New Paper Clipping
## A.Y. 2023-2024

# पर्यावरणाचे संवर्धन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य : डॉ. संदीप तडाखे

▲ पाटण, दि. १९ : पर्यावरण,संतुलन व्यवस्थित राहिले तरच आपले जीवन व्यवस्थित चालेल. पर्यावरण संरक्षणासाठी काही ठोस उपाययोजना करणे गरजचे आहे. पर्यावरणातील प्रत्येक गोष्टीची काळजी घेणे व त्याचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे, असे मत बाळासाहेब देसाई कॉलेजचे भूगोलशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संदीप तडाखे यांनी व्यक्त केले.

कला व वाणिज्य महाविद्यालय, कोयनानगर येथे भूगोल विभागाने आयोजित केलेल्या अग्रणी महाविद्यालय अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. आर. एस. क्षीरसागर होते. यावेळी मराठी विभागाचे प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. अमोल माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. तडाखे म्हणाले, प्रत्येकाला निसर्गाच्या सानिध्यात राहायला आवडते. निसर्गाचा सहवास आवडतो. मात्र निसर्गाचे रक्षण करण्यात आपण कमी पडत आहोत. पर्यावरण संवर्धन केले नाही तर जागतिक तापमान वाढीपासून ते गाव खेड्यापर्यंत दुष्परिणाम याबद्दल माहिती त्यांनी सांगितली.

प्रा. श्रीगणेश गायकवाड म्हणाले, पर्यावरणाशी सुसंवाद साधायला हवा. विद्यार्थ्यांनी आपली मानसिकता बदलणे गरजेचे आहे. निसर्गाचे संवर्धन करताना दुसरे कोणी तरी येऊन करेल यापेक्षा विद्यार्थ्यांनी स्वत: पुढे येवून पर्यावरण संवर्धन करावे. अगदी वणवा लागला असल्यास तो जरी विझवता आला तरी ते सुद्धा पर्यावरण रक्षणासाठी चांगले काम ठरू शकते.

प्रा. क्षीरसागर म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपापल्या गावात पर्यावरण संवर्धनाबाबतीत जाणीव जागृती करावी. लोकांना निसर्गाचे महत्त्व पटवून द्यावे. स्वप्न नेहमी उंच ठेवा. स्वत: स्वत:चे मूल्यमापन करायला शिका. वाचनाची आवड जोपासा व महाविद्यायातील प्रत्येक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आहेत. त्यामुळे सर्व उपक्रमात सहभागी व्हा, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात प्रा. अमोल माने यांनी कार्यशाळेची माहिती व रूपरेषा सांगितली. प्रा. पी. एस. मुसळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. अंकिता पिटे व प्रा. सुषमा सपकाळ यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. टी. चाळके यांनी आभार मानले. या कार्यक्रमास प्रा. सौ. वैशाली घाडगे, प्रा. सौ. सुषमा कुंभार, प्रा. आर. एस. शेख, प्रा. के. ए. जमादार यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.